# UGC Approved List of Journals

You searched for **ajanta**

|| Home ||

**Total Journals : 1**

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View | 1 | 40776 | AJANTA | AJANTA PRAKASHAN,AURANGABAD | 22775730 | |

Showing 1 to 1 of 1 entries


Previous 1 Next

Economics


Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL


Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com


# AJANTA

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २२. स्मार्ट सिटी - संकल्पना व फायदे

डॉ. एस. पी. सोनकांबळे
के. व्ही. एन. नाईक कला वाणिज्य महाविद्यालय, नाशिक.

## प्रस्तावना

आज प्रत्येक व्यक्ती आपले चांगले जीवन कसे जगु शकू असा विचार करत असतांना दिसून येतो. प्रत्येक व्यक्ती आपल्या परीने आयुष्य सुकर करण्याचा प्रयत्न करत आहे. तो व्यक्ती ग्रामीण भागाचा असो वा शहरी भागाचा प्रश्न हा एकच की, चांगले जीवन कसे जगता येवू शकेल. ? हाच प्रश्न त्याच्या समोर असतो व त्यासाठी तो प्रयत्न करतो. या प्रश्नाची सोडवणूक करत असताना त्याच्या जीवनांवर त्याच्या भोवतालीच्या बदलांचा परिणाम होत असतो. या बदलांमधूनच त्याचे जीवन आकार घेते. ते बदल साधारणतः सामाजिक आर्थिक, राजकीय असतात.

आर्थिक चालू घडामोडींचा विचार केला तर आज अर्थव्यवस्थेत असलेली मोठी छुपी व अर्ध बेरोजगारी, त्यामुळे उत्पन्नाचा निम्नस्तर व त्या अनुषंगाने खालावलेले राहणीमान याला कंटाळून ग्रामीण भागातील नागरीक शहराकडे आकर्षिला जात आहे व त्यामुळेच मागील १० वर्षाचा आढावा घेतल्यास आढळून येते की या शहरांची २७ टक्के वरून ३१ टक्के वाढ झालेली दिसून येते. शहर हे राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच आर्थिक विकासाचे इंजिन मानले जाते.

आज भारतातील ३१ टक्के लोकसंख्या शहरात राहते. ज्यांचे एकुण देशांतर्गत उत्पादनात ६३ टक्के योगदान आहे. आणि पुढे २०३० पर्यंत हे शहराचे योगदान ७५ टक्के होण्याची शक्यता आहे म्हणून वाढत्या लोकसंख्येला चांगले जीवनमान जगता यावे यासाठी सरकारने त्यांना चांगल्या / उच्च दर्जाच्या सेवा सुविधा पुरविणे महत्वाचे ठरते. परंतु भारताच्या बाबतीत विचार करता असे लक्षात येते की, देशात अस्तित्वात असलेली ८००० शहर व गावे याच्या सुधारणा करणे मोठे आव्हान आहे. भारतातील विकासाभिमुख शहरे म्हणून ओळखल्या जाण–या मुंबई, दिल्ली, चैन्नई, बेंगलोर, हैद्राबाद यांची लोकसंख्या ८ दशलक्षपेक्षा जास्त होवून गेली आहे. अशीच लोकसंख्येची आकडे इतरही शहरांची दिसून येतात. त्यामुळे या शहरांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते.

उदा. उर्जा, वाहतुक, स्वच्छ पाणीपुरवठा, मलविसर्जन, घन कचरा व्यवस्थापन, इमारती आणि सार्वजनिक जागा यावर पडणारा मोठा ताण इ.

अशा वरील समस्यांचे निराकरण करून देशातील नागरिकांना कशा प्रकारे चांगल्या सेवा सुविधा पुरविता येतील यासाठी धोरण कर्ते कठीण परिश्रम घेत आहेत व त्यामुळेच त्या दिशेने स्मार्ट सिटीही मोहिम नावारूपाने पुढे आली.




Scanned by CamScanner


**व्याख्या व संकल्पना**

स्मार्ट सिटी या संकल्पनेची स्वतंत्र अशी व्याख्या कोणीही केलेली नसली तरी ढोबळ मानाने खालीलप्रमाणे व्याख्या करता येतील.

१. या सिटीमध्ये लोक उत्कृष्ट शासन व्यवस्थेची आशा बाळगतात व उत्तम व्यवस्थापनेने व उच्च तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उच्च प्रतीची सेवा पारदर्शक पध्दतीने व जबाबदारीने पुरविण्यात येते परिणामकारक प्रशासन चालते आणि भ्रष्टाचाराला मुठमाती दिली जाते.

२. स्मार्ट सिटी ही अशी जागा आहे जिथे तंत्रज्ञानाचा वापर जुन्या आणि नविन समस्यांच्या निराकरणासाठी केला जातो.




कॉंक्रीटीकरणापासून ते स्टील, लोखंडी जाळयांपासून घडलेल्या जुन्या शहरांमध्ये आता संगणक सॉफ्टवेअरचे जाळे आहे. तर दुसरीकडे या प्रतिबिंबावर डिजिटल सुधारणा सहित नवीन शहरे उभी राहुन नवीन शहरांची लाट निर्माण झाली आहे ज्याला स्मार्ट सिटी म्हणता येईल.

३. आपण स्मार्ट सिटीची व्याख्या अशी करू शकतो जिथे हुशार व चपळ लोक राहतात. अशा स्मार्ट लोकांची व्याख्या करण्याच दोन प्रवाह १. जे हुशार व संपन्न आहेत व ग्राहकाची भुमिका घेवून नेहमी स्वत: भोवती फिरत असतात.

२. जे इतर लोकांपर्यंत पोहोचून त्याच्या कार्यात योगदान देणारे व मागास संवर्गातल्या लोकांच्या जीवनात बदल घडवून आणणारे असतात.

४. स्मार्ट सिटी योजनेत स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम शहरी गतिशिलता आणि सर्व परिवहन संस्था, माहिती तंत्रज्ञानाचे मजबुत जाळे, गरिबांसाठी परवडणारी घरे या बाबींवर लक्ष केंद्रित करणारी किंवा या बाबींचा समावेश ज्या योजनेत आहे अशा योजनेला स्मार्ट सिटी योजना म्हणतात.

वरील व्याख्यानावरून असा अर्थ काढता येतो की, स्मार्ट सिटी मोहीमेत ज्या शहरांना प्रगल्भ उपायांनी स्मार्ट सिटी व्हायचे आहे या स्मार्ट उपायात ईगव्हर्नन्स सेवांची इलेक्ट्रॉनिक्स पोहोच, गुन्हेगारीवर व्हिडिओ द्वारे देखरेख, जलपुरवठा व्यवस्थापनासाठी परवडणारी घरे या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

स्मार्ट सिटी संकल्पना १९८० च्या दशकात प्रथम वापरली गेली. तेव्हा शहरांच्या बाबतीत एक नवीन ओळख पुढे आली आणि तेव्हापासून या संकल्पनेचा विकास झालेला दिसतो. त्यानंतर सन २००८ मध्ये

जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान योजना ( जेएनएनआरयुएम ) शहरी विकासाच्या संदर्भात सुरू करण्यात आली व त्यानंतर जवळजवळ १० वर्षांनी स्मार्ट सिटी या योजनेची सुरूवात करण्यात आली.

तसेच या स्मार्ट सिटी मोहीमेला पुरक म्हणून एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ५०० शहरांसाठी अमृत योजनेची सुरूवात करण्यात आली, (अटल मिशन – पुर्नरूजिवनासाठी शहरी बदल अमृत योजना) अमृतची व्याप्ती जलपुरवठा, गटारे, मल:व्यवस्थापन, उद्यानांचा विकास व त्याचबरोबर स्थानिक नागरी संस्थानांनी करावयाच्या सुधारणा इतपत आहे हे जवळजवळ मान्य करण्यात आले आहे की अमृतचा अंतर्गत वित्त पुरवठा स्मार्ट सिटीजची क्षमता असलेल्या शहरांना केला जाईल.

त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना हा आणखी एक कार्यक्रम आहे. ज्यामध्ये शहरांमधील झोपडपट्टीतील व आर्थिक दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील लोकांना परडणारी दोन कोटी घरे उभारण्यासाठी पुढील सात वर्षात ३ लाख कोटी रू. खर्च केला जाईल. अस्तित्वाच्या कठोर वास्तवाच्या लढाईला सामोरे जाणारे लोक झोपडीवासी आणि शहरी गरिबांसाठी हे वरदान ठरणार आहे.

म्हणजेच स्मार्ट सिटी मोहिमेचा केंद्रबिंदु नागरी विकास हा आहे व त्या माध्यमातून जनतेला स्मार्ट सेवा सुविधा पुरविणे हा उद्देश आहे.

व्याप्ती

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी मोहिम ही देशातील १०० शहरात राबविण्यात येत आहे व या मोहिमेचा कालावधी २०१५–१६ ते २०१९–२० म्हणजेच ५ वर्षाचा ठरविण्यात आला आहे. या ५ वर्षाच्या प्रगतीचा आढावा घेवूनही योजना पुढे चालु ठेवावी की नाही याबाबत निर्णय केंद्र शासन घेईल.

राज्यनिहाय स्मार्ट सिटी विभागणी १) महाराष्ट्र – नवी मुंबई, नाशिक , ठाणे, बृहन्मुंबई, अमरावती, सोलापूर, नागपूर, कल्याण – डोबिंवली, औरंगाबाद, पुणे २) तामिळनाडू – तिरूचिरापल्ली, चेन्नई, तिरूपुर, कोईमतुर, वेल्लोर, सालेम, इरोड, तंजावर, तिरूनेलवेली, लिंडीगगुल, मदुराई, थुतकुडी, ३) उत्तर प्रदेश – मोरादाबाद, अलीगड, सहरणपूर, बरेली, झाशी, कानपूर, अलाहाबाद, लखनौ, वाराणसी, गाझियाबाद, आग्रा, उधमपूर, ४) कर्नाटक – मंगळूर, बेळगांव, शिवमोगा, हबुळी – धारवाड, तुमकुरू, दावणगेरे, ५) गुजरात – गांधीनगर, अहमदनगर, सुरत, बडोदा, राजकोट, दहीद, ६) बिहार – मुझफ्फर नगर, भागलपुर, विधान नगर, दुर्गापूर, हल्दीया ७) आंध्रप्रदेश – विशाखापटटनम, तिरूपती, काकीनाड, ८) पं. बंगाल – न्यु टाउन कोलकाता, विधान नगर, दुर्गापूर, हल्दीया, ९) मध्यप्रदेश – भोपाळा, इंदुर जबलपूर, ग्वाल्हेर, सागर, सतना, उज्जेन, १०) तेलंगण – ग्रेटर हैद्राबाद, ग्रेटरवारगंड, ११) ओडिसा – भुवनेश्वर, उरकेला, १२) पंजाब – लुधियाना, जालंदर, अमृतसर, १३) जयपूर, उदयपूर, कोटा, अजमेर, १४) हरियाना – कर्नाल, फरिदाबाद १५) छत्तीसगड – रायपूर, बिलासपूर, १६) गोवा – पणजी, १७) पासिघाट



Scanned by CamScanner

**वित्तीय तरतुद**

| अ. क्र | घटक | केंद्र शासनाचे अनुदान रू. कोटी | राज्य शासनाचे अनुदान | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उभा करावयाचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्र शासनाने निवडलेल्या स्मार्ट सिटीसाठी प्रतिवर्ष प्रती शहर उपलब्ध होणारा निधी | १०० | ५० | ५० |
| २ | स्मार्ट सिटी अभियान कालावधीमध्ये प्रत्येक स्मार्ट शहरासाठी ५ वर्षामध्ये प्राप्त होणारा निधी | ५५० | २५० | २५० |
| ३ | स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत राज्यातील १० शहरांची निवड झाल्यास ५ वर्षात उपलब्ध होउ शकणारा निधी | ५००० | २५०० | २५०० |

**सुक्ष्म दृष्टीकोनातून होणारे फायदे**

सुक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट कुटुंब वैयक्तिक, किंमती, वेतन, उत्पन्न, वैयक्तिक उद्योगधंदे आणि विशिष्ट वस्तूंचा अभ्यास होतो. म्हणजेच अर्थ व्यवस्थेचे सुक्ष्म अध्ययन करणारे शास्त्र आहे. स्मार्ट सिटी संकल्पनेमध्ये होणा—या विकासाचा किंवा बदलाचा या सुक्ष्म घटकांवर सुध्दा परिणाम होणार आहे.

**१. उपभोक्ता**

बाजारपेठेत मागणी करणारा हा उपभोक्ता असतो. मागणी करत असतांना तो ती मागणी त्याच्या उत्पन्नातून करतो. ज्याला आपण खर्च म्हणतो. स्मार्ट सिटीमुळे रोजगारात वाढ होवुन जीवनमान उंचावेल असे भाकीत केले जाते. म्हणजेच सुक्ष्म दृष्टीकोनातून स्मार्ट सिटी मध्ये होणा—या उपभोक्त्याचे उत्पन्न वाढेल आणि त्याच्या राहणीमानाचा दर्जा वाढुन बाजारपेठेमध्ये मागणी वाढल्यास मदत होईल. दुसरे असे की उपभोक्ता हा नवीन तंत्रज्ञानाशी जुडला जाईल व त्या नवीन तंत्रज्ञानाचे कायदे त्याला हाताळता येतील व त्यातून त्याचा फायदा होईल.

**२. उद्योग संस्था**

स्मार्ट सिटीच्या संकल्पनेमुळे उद्योग संस्थेच्या स्वरूपात व संघटन पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्मार्ट सिटीच्या संकल्पनेनुसार स्मार्ट सिटीच्या विकासाच्या मागणीनुसार बाजारपेठेत टिकाव धरण्यासाठी उद्योग संस्थेमध्ये येणा—या व्यवस्थापन कौशल्याचा पर्याप्त व चांगल्या प्रकारे वापर होवून त्यातुन फायदा मिळविणे महत्वाचे ठरते. तसेच उद्योग संस्थेला संघटन पध्दतीमध्येही सुधारणा करावी लागेल. सर्व उत्पादन घटकांची मागणी व निवड व्यवस्थित व चोखंदळ करून निवडावी लागेल तेव्हा स्मार्ट सिटीमुळे होणा—या किंवा तयार होणा—या स्पर्धेमध्ये टिकू शकेल.



Scanned by CamScanner

**उद्योग** – उद्योगासाठी स्मार्ट सिटी उत्पादनाच्या घटकांच्या संदर्भात महत्वाची ठरेल. कुशल व चांगल्या प्रतीचे उत्पादन घटक मिळतील. तसेच स्थानिक विकसित बाजारपेठ उपलब्ध होवून स्थानिक बाजारपेठेत मागणी वाढण्याची शक्यता निर्माण होईल. दळणवळणाच्या व वाहतुकीच्या साधनांमुळे उत्पादन घटक लवकरच मिळतील व पक्या मालाला लवकर बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल.

**उत्पादन घटक**

स्मार्ट सिटीमध्ये श्रमिक या घटकाच्या कौशल्यामध्ये मागणीनुसार विकास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्यांच्या कौशल्यानुसार त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. श्रमिकांना स्मार्ट सिटीच्या बदलांमुळे व विकासामुळे विविध क्षेत्रात विविध रोजगारासंबंधी उपलब्ध होईल. श्रमाच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे श्रमिकांचे जीवनमान उंचावेल. स्मार्ट सिटीमधील उत्पादन संस्थेमध्ये तसेच उद्योग धंद्यामध्ये विशेषीकरण व श्रमविभागणी या संकल्पना चांगल्या प्रकारे उद्योग संस्थेत रूजविल्या जातील. तसेच त्यामधून वस्तुची मागणी व दर्जामध्ये सुधारणा घडवून आणल्या जातील. श्रम विभागणीमध्ये उद्योग संस्था, संयोजकांना मोठया प्रमाणात मागणी करून उद्योगात वेगवेगळया विभागानुसार संयोजकांना कामावर घेईल. स्मार्ट सिटीमध्ये भुमीला मोठया प्रमाणात मागणी येईल व भुमीला खंड किंवा मोबदला वाढला जाईल. कारण स्मार्ट सिटीमुळे जो विकास होईल त्यावरून भूमीचे महत्व दिवसेंदिवस वाढेल. कारण भुमीचा पुरवठा वाढविता येत नाही. म्हणून स्मार्ट सिटीमधील आहे. त्या भुमीला जास्त मोबदला मिळेल. स्मार्ट सिटीमधील उद्योजक चांगल्या दर्जाचा व जास्त उत्पाद करण्यासाठी नवीन तंत्राना व यंत्राला मागणी करतील व तदनुसार उत्पादन करण्याची क्रिया करून स्पर्धेमध्ये टिकवण्यासाठी प्रयत्न करतील.

**स्थुल दृष्टीकोनातून होणारे फायदे**

**फायदे**

**१. जीवनाचा दर्जा उंचावणार**

स्मार्ट शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावलेला असेल. अत्याधुनिक पायाभूत सुविधा, चोवीस तास वीजेचा पुरवठा, स्वच्छ पाण्याचा पुरवठा, शिक्षणाचे विविध पर्याय, मनोरंजन, आणि क्रिडाविषयक साधनांची उपलब्धता, शाळा, आणि महाविद्यालये तसेच रूग्णालयांमध्ये आधुनिक साधनांचा वापर होत असल्याने तेथील जीवन सर्व सुविधांनी बहरलेले असेल.

**२. बेरोजगारी दरात कमी**

भारतात सध्या २००४–०५ मध्ये कामगार लोक संख्येपैकी ३४.७४ दशलक्ष लोकसंख्या बेरोजगाराची होती व त्यानुसार बेरोजगारीचा दर ८.२८ टक्के इतका होता.

तसेच २००९–१० मध्ये युपीएसएस पध्दतीच्या आधारावर बेरोजगारीचा दर हा शहरी भागात ३.४ टक्के एवढा आहे. त्यामुळे या स्मार्ट सिटी मोहिमेच्या अंतर्गत होणाऱ्या गुंतवणूकीमुळे शहरी भागातील बेरोजगाराच्या दरात घट होईल.



Scanned by CamScanner

**३. दारिद्रयाचे प्रमाण कमी होण्यास मदत**

अर्थ व्यवस्थेतील दारिद्रय निर्मुलन करणे ही एक सरकारची महत्वाची जबाबदारी आहे. त्यासाठी सरकारने वेगवेगळया योजना सुरू करून दारिद्रय कसे कमी करता येईल यासाठी प्रयत्न केलेत. युआरपी पध्दतीच्या आधारावर २००४—०५ मध्ये भारतातील दारिद्रय संपूर्ण देशात २७.५ टक्के इतके होते व शहरी भागात २५.७ टक्के होते. स्मार्ट सिटी मोहिमेमुळे शहरी भागातील दारिद्रयात घट घडून येईल.

**४. गुंतवणूकीत वाढ**

स्मार्ट सिटी मोहिमे अंतर्गत मोठया उद्योगांना स्वस्तात वाहतुकीच्या सेवा सोयी तसेच स्वस्तात वीज पुरवठा मिळाल्याने तसेच या ठिकाणी उपलब्ध असलेली मनुष्य बळाची मार्केट त्यामुळे उद्योजक मोठया प्रमाणावर गुंतवणूक करतील.

उदा. सध्या भारताने एफ.डी.आय. अंतर्गत अमेरिका व चीनला मागे टाकलेले दिसते.

**५. आर्थिक विकासात वाढ**

स्मार्ट शहरांमध्ये ज्या त्या शहरांना आपल्याला मिळालेल्या ऐतिहासिक, आर्थिक, सांस्कृतिक वारसा प्रमाणे खाद्य प्रकार, आरोग्य, शिक्षण, कला, हस्त, व्यवसाय, किडा सामान, लाकडी सामान, होजिअरी, विणकाम इ. वर आधारित आर्थिक उपक्रमांवर आधारित ब्रॅड व ओळख मिळतील. त्यामुळे स्मार्ट सिटी केवळ उत्पादनाचे स्थान नसून उपभोगाचे स्थान देखील आहे. अशा सर्व आर्थिक किया कलापासून एकुण आर्थिक विकासास चालना मिळेल.

**६. टाकाऊ पदार्थाची योग्य प्रकारे विल्हेवाट**

आज भारतातील वेगवेगळया शहरातील निर्माण होणाऱ्या सांडपाण्यापैकी केवळ २० टक्के पेक्षा कमी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्याचप्रमाणे २०१३—१४ मध्ये घन, कचरा, १,४२,५६६ टन गोळा केली. जमा झालेल्या ८२ पैकी २९ कचरा खत म्हणून तसेच काही प्रमाणात उर्जाशक्ती प्रकल्प वापरला गेला. अशा प्रकारे स्मार्ट सिटी मोहिमेत या टक्केवारीत वाढ होण्याची दाट शक्यता आहे.

**सारांश**

एकंदरीत पहिल्यांदाच असे घडते आहे की शहरी विकास मंत्रालयाद्वारे विकासाकरिता प्रतिस्पर्धा पध्दतीचा वापर केला जात आहे.या प्रतिस्पर्धे बरोबरच सहकारी संघवादाची भावना निश्चित आहे. स्मार्ट सिटी मिशन यशस्वी होण्याकरिता स्मार्ट लोकांची आवश्यकता आहे जे शासन आणि सुधारणांमध्ये सक्रीय रूपाने सहभागी होतील. अशा प्रकारे "लोकांनी लोकांची लोकांसाठी चालविली योजना हे लोकशाहीचे खरे स्वरूप समार्ट सिटी मिशनला प्राप्त होईल."

**संदर्भ**

१. स्थुलअर्थशास्त्र — राम देशमुख
२. योजना मासिक — अंक — १४,२०१५
३. आर्थिक विकास व नियोजन — डॉ. ढमढेरे



Scanned by CamScanner